# अर्थ प्रशासन विभाग
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

---

जाक./अप्रवि/अंसेनियो/1355/२०२१ दिनांक:21 / 1/२०२१

## परिपत्रक

सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, सन 2020–2021 या आर्थिक वर्षात नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील राजीनामा दिलेल्या, वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांची माहिती / प्रस्ताव कृषि व पदुम शासन निर्णय कमांकः संकिर्ण–1514/प्र.क.117/6–अे दिनांकः 30/11/2015 नुसार मागितलेल्या **नमुना अ,ब,क,ड मध्ये रितसर भरून आणि डि.सी.पी.एस. च्या (D.C.P.S. Information Statement) विवरणपत्रकांवर प्रमाणक क. (Voucher.No) व दिनांक सहीत नियंत्रण अधिकारी यांची साक्षांकित केलेल्या प्रतींसह** या कार्यालयास सादर करणे गरजेचे आहे. परंतु अद्यापपर्यंत संबंधित विभागांचे विहीत नमुन्यातील प्रस्ताव या कार्यालयास अप्राप्त आहे.

**तसेच नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील सेवानिवृत्त होणा–या अधिकारी/कर्मचारी यांची माहिती अद्ययावत I.U.M.S. Software मध्ये ठेवण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहिल. या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील अधिकारी/कर्मचारी यांची अंशदानाची माहिती I.U.M.S. Software मध्ये अद्यापपर्यंत भरलेली नाही.**

त्यामुळे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या डि.सी.पी.एस. खात्यात जमा झालेले **अंशदान व त्यावरिल व्याजाची अचूक आकडेवारी संग्रहित करणे शक्य होत नाही.** सदर प्रकरणी निर्माण होणा–या अडचणींस **संबंधित आहरण व संवितरण अधिकारी** जबाबदार राहतील, याची कृपया नोंद घ्यावी.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

प्रतिलिपि:

१) मा. कुलगरूंचे तांत्रिक सचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना मा. कुलगुरूंचे माहितीकरीता सविनय सादर.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.